# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय,मुंबई

## जिल्हा उद्योग केंद्र,बुलढाणा

# मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निर्देशानुसार १०० दिवसांचा कृती कार्यक्रम

## उद्योग विभाग-जिल्हा उद्योग केंद्र – अंतर्भूत बाबी

# मूल्यमापनासाठी गुणांकन तक्ता

| अ.क्र. | निकष | गुण |
|---|---|---|
| 1 | सांकेतस्थळ (Website) | 10 |
| 2 | सुकर जीवनमान (Ease of Living) | 10 |
| 3 | स्वच्छता (Cleanliness) | 10 |
| 4 | तक्रार निवारण (Grievance Redressal) | 10 |
| 5 | कार्यालयीन सोई सुविधा (Office Amenities) | 10 |
| 6 | क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visits to Regional Field Offices) | 8 |
| 7 | ई-ऑफीस प्रणाली (E-Office System) | 5 |
| 8 | आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन (Promotion of Economic and Industrial Investment *) | 7 |
| 9 | अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) [(Officers- Staff Training, Service Related, Judicial Matters and Use of Artificial Intelligence Technology (AI)] | 10 |
| 10 | नाविन्यपूर्ण उपक्रम (Innovative Initiatives) | 20 |
| | **एकूण (अ.क्र. 1 ते अ.क्र. 10)** | **100** |

# MAHARASHTRA EXPORT CONVENTION-2024-25



# 1. संकेतस्थळ (एकूण 10 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | वापरण्यातील सुलभता (User Friendly) | 7.1.25 – 15.4.25 | उद्योग संचनालयातर्गत तसेच केंद्रशासन वेबसाइट या वापरण्यास सुलभ आहेत<br>1.https://kviconliine.gov.in<br>2.https://maha.cmegp.gov.in<br>3.https://maitri.maharshtra.gov.in<br>4.https://udyamregistration.gov.in | 2 |
| आ) | माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information) | 7.1.25-15.4.25 | संकेतस्थळ बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे | 2 |
| इ) | माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण (Proactive disclosure under RTI Act) | 7.1.25-15.4.25 | माहिती अधिकार  कलम ४ अंतर्गत माहिती प्रकाशित केली आहे | 2 |
| ई) | सुरक्षितता (Data / Cyber Security ) | 7.1.25-15.4.25 | ऑनलाइन सेवा https://maitri.maharshtra.gov.in  वर अधिस्थपित आहेती | 2 |
| उ ) | लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईनप्रसिध्द करणे | 7.1.25-15.4.25 | सामुहीक प्रोत्साहन योजना व उद्यम नोंदणी ऑनलाइन सेवा चालू आहेत | 2 |
| | एकूण : | | | 10 |

# 2.सुकर जीवनमान

(एकूण 10 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | नागरी सेवांचे सुलभीकरण (किमान 2 सेवा) प्रत्येक पूर्वीची स्थिती व सूलभीकरणानंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक) सेवेसाठी 5 गुण | | | |
| | अर्जदाराकडुन अर्ज स्विकृती | 7.1.25 - 15.4.25 | सद्यस्थितीत जिल्हा उद्योग केंद्रामध्ये एकल खिडकी द्वारे विविध योजनांचे फार्म ऑनलाइन भरुन घेतले जातात तसेच अर्जदारांना भ्रमणध्वनी/दूरध्वनी वरून मार्गदर्शन कले जाते | 5 |
| | बँकेत ऑनलाईन पध्दतीने कर्ज प्रकरणे शिफारस केली जातात | 7.1.25 - 15.4.25 | याप्रक्रीयेद्वारे एकूण 1285 कर्जप्रकरणे लोन प्रकरणे बँकेत पाठवली गेली. | 5 |
| | तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (EDTP) | 7.1.25-31.3.25 | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) बुलढाणा मार्फत 788 व मिटकॉन,बुलढाणा मार्फत 819 लाभार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे असे एकुण 1607 प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. | |
| | एकूण : | | | 10 |

# 3. स्वच्छता (एकूण 10 गुण)

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | अभिलेखे निंदणीकरण, वर्गीकरण | 07.01.25 – 15.04.25 | अभिलेखे निंदणीकरण, वर्गीकरण काम प्रगतीपथावर | 2 |
| आ) | मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे | 07.01.25 – 15.04.25 | काम प्रगतीपथावर | 2 |
| इ) | जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण | 07.01.25 – 15.04.25 | अद्ययावत आहे | 2 |
| ई) | जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट | 07.01.25 – 15.04.25 | काम प्रगतीपथावर | 2 |
| उ) | जुन्या वाहनांचे निर्लेखन | 07.01.25 – 15.04.25 | निर्लेखन झालेले आहे | 2 |
| | एकूण: | | | 10 |

# 4. तक्रार निवारण (एकूण 10 गुण)

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी निरकरण (दि.1 जानेवारी, 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | 07.01.2025-15.04.2025 | तक्रारी निरंक आहेत | 2.5 |
| आ) | पी.जी. पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण (दि.1 जानेवारी, 2025 पूर्वीच्या तक्रारी निरंक करणे) | 07.01.2025-15.04.2025 | तक्रारी निरंक आहेत | 2.5 |
| इ) | अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी | 07.01.2025-15.04.2025 | कार्यालयीन दिवशी दु 2 ते 5 | 2.5 |
| ई) | लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण | 07.01.2025-15.04.2025 | तक्रारी निरंक आहेत | 2.5 |
| | एकूण : | | | 10 |

# 5. कार्यालयीन सोई सुविधा (एकूण 10 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | 07.01.2025-15.04.2025 | उपलब्ध आहे | 2 |
| आ) | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था. | 07.01.2025-15.04.2025 | उपलब्ध आहे | 2 |
| इ) | अभ्यांगतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था | 07.01.2025-15.04.2025 | उपलब्ध आहे | 2 |
| ई) | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे | 07.01.2025-15.04.2025 | उपलब्ध आहे | 2 |
| उ) | कार्यालयाचे सौंदर्यीकरण | 07.01.2025-15.04.2025 | करण्यात आलेले आहे | 2 |
| | एकूण: | | | 10 |

# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (एकूण 10 गुण)

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | आठवडयातून किमान दोन दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे | 07.01.2025 - 15.04.2025 | नेमुन दिलेल्या दिवशी आपले कार्यक्षेत्रात मार्गदर्शन करण्यात येत आहे. | 2 |
| आ) | केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देऊन अंमल बजावणी व पर्यवेक्षण करणे | 07.01.2025 - 15.04.2025 | राज्य शासनाच्या औद्योगिक समुह योजनेअंतर्गत विविध प्रकल्पांना भेटी देऊन अंमल बजावणी व पर्यवेक्षण केले जाते. | 2 |
| इ) | क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे | 07.01.2025 - 15.04.2025 | लागू नाही | 2 |
| ई) | ग्राम स्तरावरील कर्मचा-यांचे अनुभव, अडचणी व सूचना यांवर त्वरीत कार्यवाही करणे | 07.01.2025-15.04.2025 | लागू नाही | 2 |
| | **एकूण:** | | | 8 |

# FIELD VISIT IN MIDC,MALKAPUR





# 7. ई –ऑफिस प्रणाली

(एकूण 5 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी, 2025 पासून ई-ऑफीस प्रणालीचा वापर करणे | 07.01.2025 - 15.04.2025 | काम प्रगति पथावर आहे. | 2.5 |
| आ) | ई-ऑफीस प्रणालीत 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे | 07.01.2025 - 15.04.2025 | काम प्रगति पथावर आहे. | 2.5 |
| | **एकूण:** | | | 5 |

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन (एकूण 7 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे | 07.01.2025-15.04.2025 | बुलढाणा मध्ये दि.28.02.2025 रोजी निर्यात प्रचालन कार्यशाळा मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. असून या 8 एप्रिल 2025 रोजी जिल्हा स्तरीय गुंतवणूक परिषदचे आयोजन करण्यात आले आहे. त्या मध्ये एकुण 86 सामजस्य करारामधुन रु 721.67 कोटी गुंतवणूक व 3044 इतके रोजगार प्रस्तावित आहे. सदर कार्यशाळेचे मा.पालकमंत्री,जिल्हयाचे खासदार,जिल्हयातील आमदाराच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आयोजन करण्यात आले.परीषदेस नवउद्योजक, औद्योगिक संघटना एकुण 250 लोकांनी सहभाग घेतला यामध्ये उद्योगाशी संबंधित विविध विभागाच्या तज्ञांनी मार्गदर्शन/सादरीकरण केले याचा उद्योगांकरीता पोषक वातावरण तयार होण्याकरीता फायदा होईल. | 2 |
| आ) | व्यापारी/कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे | 07.01.2025-15.04.2025 | व्यापारी/उद्योजकांच्या अडचणी सोडविणेकरीता दि.20/03/2025 रोजी एमआयडीसी मलकापूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.मा.जिल्हाधिकारी यांनी उद्योजकांशी चर्चा व मार्गदर्शन केले. | 1 |
| इ) | गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण करणे | 07.01.2025-24.04.2025 | उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणेकरीता मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीच्या सभेमध्ये उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करण्यात येते.तसेच याबाबत औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यासमवेत दि.28.02.2025 रोजी बैठक संपन्न झाली आहे. | 2 |
| ई) | गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे | 07.01.2025-24.04.2025 | याबाबत जिल्हा उद्योग मित्र समिती सभेमध्ये चर्चा होवून संबंधितांना मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्यामार्फत सुचना/निर्देश देयात येतात. | 2 |
| | **एकूण:** | | | 7 |






लोकमत

# गुंतवणूक परिषदेत ८६ सामंजस्य करार, ६३१.६७ कोटींची गुंतवणूक

## सलग दुसऱ्या वर्षी यशस्वी आयोजन: कृषी क्षेत्रासोबतच उद्योगातही जिल्हा अग्रेसर होईल - पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**बुलढाणा :** जिल्ह्यात आयोजित जिल्हा गुंतवणूक परिषदेत विविध क्षेत्रांमध्ये ८६ सामंजस्य करार झाले आहेत. यामध्ये ६३१.६७ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल, ज्यामुळे २,९२४ नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. या करारांमध्ये वस्त्रोद्योग, कृषी प्रक्रिया, अन्न प्रक्रिया, अभियांत्रिकी, बायोटेक, रसायन आणि इतर क्षेत्रांचा समावेश आहे. या गुंतवणुकीमुळे जिल्ह्याच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला गती मिळणार असून, स्थानिक रोजगार निर्मितीला देखील महत्त्वपूर्ण हातभार लागेल.

सामंजस्य करारांमध्ये वस्त्रोद्योग क्षेत्रात १२१.३९ कोटी गुंतवणुकीचे २० सामंजस्य करार, कृषी प्रक्रिया क्षेत्रात ५८.८० कोटींचे १३, अन्न प्रक्रिया क्षेत्रात ४६.७९ कोटींचे १४, अभियांत्रिकी क्षेत्रात ३४.१० कोटींचे ९, बायोटेक क्षेत्रात ७०.५४ कोटींचे ३, रसायन क्षेत्रात १६१.५५ कोटींचे २४ असे एकूण ८६ करार करण्यात आले.

जिल्हा गुंतवणूक परिषदेत पालकमंत्री मकरंद पाटील, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उद्योग उपसंचालक रंजना पोळ, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनील पाटील, ॲड. नाझेर काझी, तसेच जिल्ह्यातील उद्योजक, निर्यातदार, व्यापारी आदीसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



गुंतवणूक परिषदेस मार्गदर्शन करतांना मकरंद पाटील, प्रतापराव जाधव आणि उपस्थित मान्यवर.

### 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती'त जिल्हा राज्यात चौथ्या स्थानी

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात बुलढाणा जिल्हा राज्यात चौथा आणि अमरावती विभागात पहिला ठरला आहे. पालकमंत्री मकरंद पाटील यांनी याबद्दल अभिमान व्यक्त करत सांगितले की, अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांनी १०० टक्क्यांपेक्षा अधिक साध्य करून विभाग प्रथम आला आहे. जिल्ह्यात ६७३ हेक्टर औद्योगिक क्षेत्र आहे, आणि त्याच्या विस्तारावर लक्ष दिले जात आहे.

### 'एमआयडीसी'चा विस्तार करण्यात यावा - जाधव

'एमआयडीसी'मधील जागांचे सर्वेक्षण करून ज्यांनी जागा अडविल्या आहेत, त्यांची माहिती संकलित करण्यात यावी, असे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले. काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचेही निदर्शनास आले असून, प्रशासनाने त्याचा सखोल आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, बँकांनी गरजूंना आणि लघु उद्योजकांना प्राधान्याने कर्ज वितरित करावे, अशी सूचना त्यांनी केली.

**४६५**

गेल्या वर्षी ४६५ कोटी रुपयांचे ३८ उद्योजकांशी करार झाले होते. त्यापैकी प्रत्यक्षात २६ उद्योजकांनी आतापर्यंत २५० कोटी रुपयांची गुंतवणूक जिल्ह्यात केली आहे. यासोबतच जिल्ह्यात टुरिझम कॉरिडॉर निर्मितीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

**कोटीचे सामंजस्य करार गतवर्षी झाले होते**

### निर्यात दीड हजार कोटींवर पोहोचण्याचा अंदाज!

जिल्ह्यातील निर्यात १,५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज असून, पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाच्या दिशेने पुढाकार घेण्याचे आवाहन पालकमंत्री पाटील यांनी केले. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील प्रबळ औद्योगिक क्षमतांवर भर देत कापूस आणि सोयाबिनसारख्या कच्च्या मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची आवश्यकता व्यक्त केली. समृद्धी महामार्ग आणि रेल्वेच्या दळणवळण सुविधांचा उपयोग करून जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्राला चालना मिळवता येईल, असे ते म्हणाले. यावेळी आमदार डॉ. संजय कुटे, आमदार संजय गायकवाड आणि जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी उद्योगवाढ, रोजगार निर्मिती आणि गुंतवणुकीवर लक्ष केंद्रीत करण्याचे महत्त्व सांगितले.

Hello Buldhana
Page No. 1 Apr 09, 2025
Powered by: erelego.com

# गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणीचे निराकरण

**मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली व मा.खासदार यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.28/02/2025 रोजी जिल्हा उद्योग मित्र समितीची औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी यांचे समवेत सभा घेण्यात आली आहे.**



# दि.20/03/2025 रोजी मलकापूर येथे स्टेट बँकेची नवीन फॉरेक्स शाखेचे मा जिल्हाधिकारी यांचे हस्ते उदघाटन करण्यात आले आहे.




**पुण्य नगरी**

## मलकापूरमध्ये स्टेट बँकेची नवीन फॉरेक्स शाखा

### उद्योजक, निर्यातदारांना दिलासा; अकोल्याच्या चकरा थांबणार

**बुलढाणा**, दि. २१ (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील निर्यातदार आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) विकासाला चालना देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने मलकापूरच्या मुख्य शाखेत नवीन फॉरेक्स शाखा सुरू केली आहे. या शाखेचे मंगळवारी उद्‌घाटन झाले असून या नवीन शाखेमुळे आता जिल्ह्यातील उद्योजक, निर्यातदारांना फॉरेक्स सेवांसाठी अकोला येथे जाण्याची आवश्यकता राहणार नाही.

या विशेष फॉरेक्स शाखेसाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. याशिवाय, जिल्हा उद्योग केंद्र बुलढाणा आणि एसबीआयच्या बुलढाणा क्षेत्रीय कार्यालयाचे प्रबंधक मोहंमद इकबाल यांनीही योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे स्थानिक व्यावसायिकांना विशेष फॉरेक्स सेवांचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

**निर्यातीत बुलढाणा जिल्हा अव्वल**

गेल्या तीन वर्षांत अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा निर्यातीमध्ये अव्वल राहिला आहे. यंदाच्या चालू आर्थिक वर्षात बुलढाणा जिल्ह्यातून ४६५ कोटी रुपयांवर उत्पादनांची निर्यात झाली आहे. या नवीन फॉरेक्स शाखेच्या स्थापनेमुळे जिल्ह्यातील आर्थिक विकासाला आणखी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**'या' सेवा मिळणार**

नवीन फॉरेक्स शाखेत परकीय चलन व्यवहार, व्यापार वित्त आणि निर्यात-आयात व्यवहारांसाठी सल्लामसलत यांसारख्या सेवा पुरवण्यात येणार आहेत. जागतिक व्यापार सुलभ करण्यासाठी आणि स्थानिक उद्योगांना अधिक सक्षम करण्यासाठी एसबीआयने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व निर्यातदार आणि एमएसएमई प्रतिनिधींनी या विशेष सेवांचा लाभ घेण्यासाठी मलकापूर मुख्य शाखेला भेट देण्याचे आवाहन केले आहे. ही शाखा तज्ज्ञ कर्मचारी आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून जागतिक व्यापाराच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन फॉरेक्स शाखेच्या स्थापनेमुळे बुलढाणा जिल्ह्यातील व्यावसायिकांसाठी जागतिक बाजारपेठेत स्थान निर्माण करण्याची संधी उपलब्ध होणार असून स्थानिक उद्योगांना अधिक स्पर्धात्मक बनवण्यात मदत होणार आहे. याविषयी अधिक माहितीसाठी आणि चौकशीसाठी एसबीआयच्या मलकापूर मुख्य शाखेला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Buldhana Edition

Mar 22, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

# 9. अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण ,सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरू करणे (एकूण 10 गुण)

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
|---|---|---|---|---|
| अ) | नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे | 14.04.2025-23.04.2025 | उद्योग निरीक्षक यांचे प्रशिक्षण चालु आहे. | 2.5 |
| आ) | पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणे | 07.01.2025-15.04.2025 | पदोन्नतीचे कामकाज हे विभागीयस्तरावर व मुख्यालय स्तरावर केले जाते. | 2.5 |
| इ) | कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे. | 07.01.2025-15.04.2025 | IGOT (Integrated Government Online Training) ला रजिस्ट्रेशन प्रगतिपथावर आहे | 2.5 |
| ई) | कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे. | 07.01.2025-15.04.2025 | प्रगतिपथावर आहे. | 2.5 |
| | **एकूण:** | | | 10 |

# 10. नाविन्यपुर्ण उपक्रम

(एकूण 20 गुण)

| अ. क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती | गुण |
| --- | --- | --- | --- | --- |
| अ) | MSME-MSSIDC-RAMP अंतर्गत इतर प्रशिक्षण कार्यक्रम | 07.01.2025 - 15.04.2025 | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) बुलढाणा मार्फत MSME RAMP अंतर्गत एकूण 220 उद्योजकांना प्रशिक्षण देण्यात आले | 10 |
| ब) | मलकापूर येथे स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेची फॉरेक्स शाखा सुरु झाली आहे. | 07.01.2025 - 15.04.2025 | मा.जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शना खाली व जिल्हा उद्योग केंद्रांच्या पाठपुरव्यामुळे मलकापुर येथे दि.20/03/2025 रोजी स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेची फॉरेक्स शाखा कार्यान्वीत झाली आहे. | 10 |
| | **एकूण:** | | | 20 |

# 11.अधिकारी कर्मचारी यांच्या सभा

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| अ) | सर्व क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांच्या विविध विषयायांबाबतच्या तांत्रिक कामकाज, योजना विषयक कामकाज इ. सभा घेऊन त्यांचे इतिवृत्त तयार करणे व वेळोवेळी पूर्ततेबाबत आढावा घेणे. | 07.01.2025 - 15.04.2025 | नियमित आढावा घेण्यात येत आहे. |
| आ) | सर्व प्रकारची नोंदणीकृत उद्योगाची  माहिती अद्यावत करणे. | 07.01.2025 - 15.04.2025 | माहे मार्च 2025 अखेर अद्यावत आहे |
| इ) | प्रलंबित लेखा परीक्षण मुददयांचे अनुपालन करणे. | 07.01.2025 - 15.04.2025 | कार्यवाही चालू आहे |
| ई) | कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या मध्ये संघभावना निर्माण करणे. | 07.01.2025 - 15.04.2025 | समन्वय व संघ भावना आहे. |

# 12.मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गतअंर्तर्गत जिल्हयास जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयास 407 व खादी ग्रामोद्योग कार्यालयास 271 असे एकुण 678 मंजूर कर्जप्रकरणांचे उद्दीष्ट प्राप्त आहे. या योजनेअंतर्गत जिल्याचा राज्यात चौथा क्रमांक व अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे.

| कार्यान्वयीन यंत्रणा | उद्दीष्ट | साध्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| जिल्हा उद्योग केंद्र | 407 | 568 | 139.55% |
| खादी ग्रामोद्योग | 271 | 259 | 95.57% |
| एकुण | 678 | 827 | 121.98% |

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम(CMEGP)

## 100 दिवसांच्या कार्यक्रमाच्या कालावधीत केलेली प्रगती

| कार्यन्वयीन यंत्रणा | उद्दीष्ट | कार्यक्रम कालावधीत मंजूर प्रकरणे |
|---|---|---|
| जिल्हा उद्योग केंद्र | 407 | 568 |
| खादी ग्रामोद्योग मंडळ | 271 | 259 |
| एकुण | 678 | 827 |

# 13.पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)

- पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत 31.03.2025 अखेरपर्यंतची प्रगती खालीलप्रमाणे आहे

| उद्दीष्ट | | साध्य | |
|---|---|---|---|
| भौतिक | आर्थिक(रु.लक्ष) | भौतिक | आर्थिक(रु.लक्ष) |
| 58 | 158.00 | 51 | 180.46 |

- सदर योजने अंतर्गत प्राप्त उद्दीष्ट पुर्ण झालेले असून तसेच ज्यांचे अनुदान दावे योजनेच्या पोर्टलवर सादर झालेले नाही त्यांचे अनुदान दावे पोर्टलवर सादर करणेकरीता बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
- **100 दिवसांच्या कार्यक्रमाच्या कालावधीत केलेली प्रगती**

| उद्दीष्ट | | कार्यक्रम कालावधीत साध्य | |
|---|---|---|---|
| भौतिक | आर्थिक(रु.लक्ष) | भौतिक | आर्थिक(रु.लक्ष) |
| 58 | 158.00 | 14 | 55.58 |

# 14.सुधारीत बीज भांडवल योजना(SMS)

सुधारीत बीज भांडवल योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे लक्षांक पुर्ण झाले आहे.

| योजना | लक्षांक भौतीक | लक्षांक आर्थिक (लाख) | साध्य भौतीक | साध्य आर्थिक (लाख) |
|---|---|---|---|---|
| GEN | 4 | 5.00 | 5 | 5.00 |
| SCP | 1 | 1.00 | 1 | 1.00 |
| OTSP | 1 | 0.60 | 1 | 0.60 |

# 15.जिल्हा उद्योग केंद्र,कर्ज योजना (DIC LOAN)

- जिल्हा उद्योग केंद्र, कर्ज योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे लक्षांक पुर्ण झाले आहे.

| योजना | लक्षांक भौतीक | लक्षांक आर्थिक (लाख) | साध्य भौतीक | साध्य आर्थिक (लाख) |
|---|---|---|---|---|
| SCP | 1 | 0.60 | 2 | 0.60 |
| OTSP | 1 | 0.60 | 1 | 0.60 |

# 16.उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(EDTP)

- उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत खालीलप्रमाणे लक्षांक पुर्ण झालेले आहे.

| योजना | लक्षांक भौतीक | लक्षांक आर्थिक (लाख) | साध्य भौतीक | साध्य आर्थिक (लाख) |
|---|---|---|---|---|
| GEN | 667 | 20.00 | 667 | 20.00 |
| SCP | 850 | 25.50 | 850 | 25.50 |
| OTSP | 90 | 2.70 | 90 | 2.70 |

सदर योजने अंतर्गत प्राप्त उद्दीष्टानुसार प्रशिक्षण कार्यक्रम 100 दिवसांच्या कार्यक्रम कालवधी दरम्यान पुर्ण झाले असून एकुण 1607 प्रशिक्षणार्थींना तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# 17.सामुहिक प्रोत्साहन योजना (PSI)

- सामुहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत विविध प्रयोजनार्थ मुद्रांक शुल्क सवलत प्रमाणपत्र, पात्रता प्रमाणपत्र तसेच अनुदान दावे कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर सत्वर कार्यवाही होवून परिपुर्ण प्रकरणांत विहीत कालमर्यादेत कार्यवाही पुर्ण करण्यात येत आहे.

- तसेच लोकसेवा हक्क अधिनियम अन्वये निश्चित केलेल्या कालावधीत सर्व प्रकारच्या प्रकरणे कार्यवाही करुन प्रलंबित प्रकरणांची संख्या निरंक ठेवण्यात येईल.

# 18.औद्योगिक विकास समुह योजना(Cluster)

- जिल्हयामध्ये सद्य:स्थितीत 02 DPR व 4 DSR असे एकुण 06 औद्योगिक समुह मंजूर झालेले आहेत.
- जिल्हयामध्ये एकुण 04 औद्योगिक समुह प्रस्तावित असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल व सदरचे औद्योगिक समुह मंजुरी करीताची कार्यवाही करण्यात येईल.
- मंजुर औद्योगिक समुहांपैकी

  1.श्यामकुटीर रेडीमेड गारमेंट क्लस्टर चिखली चा रु. 8.53 कोटी डीपीआर मंजूर झाला आहे.

  2.नागवेली खवा प्रोसेसिंग क्लस्टर जळगाव जामोद, रु. 5.30 कोटी डीपीआर मंजूर झाला आहे.

या कार्यालयाचे महाव्यवस्थापक, व्यवस्थापक व उद्योग निरीक्षक हे विविध तालुक्यांना भेटी देवुन व जिल्हयामध्ये जास्तीत जास्त औद्योगिक समुह निवडण्याचे काम करीत आहेत.

# 19.इतर

- या कार्यालयाकडे औद्योगिक क्षेत्रातील भुखंड हस्तांतरणाकरीता ना हरकत मिळणेकरीताचे अर्ज तात्काळ प्रकीया करण्यात येवून परिपुर्ण प्रस्ताव प्रकरणी विहीत कालमर्यादेत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत असून सदरबाबत याचप्रमाणे कार्यवाही पुढील काळातही सुरु ठेवण्यात येईल.
- एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत बुलढाणा जिल्हयासाठी कापुस व बी-बियाणे या दोन उत्पादनांची निवड करण्यात आली आहे. ODOP औद्योगिक समुह जिनिंग ॲन्ड प्रेसिंग देऊळगाव राजा येथे प्रस्तावित आहे.


# निर्यातीमध्ये बुलढाणा जिल्हा हा अमरावती विभागामध्ये प्रथम क्रमांकावर आहे.

## Buldhana District – Export Scenario (as on December 2024)


*All values in INR crore*

| | Total Exports (INR crore) FY 2023-24 | Percentage Contribution (FY 2023-24) | Total Exports (INR crore) (FY 2024-25 till December 24) | Percentage Contribution (FY 2024-25 till December 24) |
|---|---|---|---|---|
| **Maharashtra** | 5,56,400 | 15.37% to the country's export share | 4,05,229 | 15.08% to the country's export share |
| **Amravati Region** | 2,190 | 0.39% to state's export share | 1,406 | 0.34% to state's export share |
| **Buldhana District** | 841 | 38% to Amravati region's export share | 627 | 45% to Amravati region's export share |

**Top Exporting product from Buldhana district FY 2024-25 Till Dec 2024**




**Top Importing Countries from Buldhana district FY 2023-24 Till Dec 2024**




Source – Directorate General of Commercial Intelligence and Statistics (DGCIS)

# जिल्हा उद्योग केद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची खालीलप्रमाणे QR Code द्वारे ऑनलाईन स्वरुपात माहीती दिली जाते.



# !!धन्यवाद!!